पुस्तक आणि बरच काही

दिवाळी अंक २०२४

www.pustakanibarachkahi.com

नमस्कार वाचकांनो,

आपल्या माहितीकरिता, सदर दिवाळी अंक हा वाचन प्रेरणेचे ध्येय ठेऊन वाचक प्रेमींसाठी सादर केलेला असल्याने अर्थातच हा विनामूल्य आहे. या अंकात सादर केलेले सर्व साहित्य हे लोकसहभागातून असल्याने कोणत्याही प्रकारचे आक्षेप अथवा तक्रार असल्यास संबंधित नमूद लेखकाशी संपर्क साधावा. पुस्तक आणि बरच काही संस्थापन सदस्य आपल्या मदतीस उपलब्ध राहतील पण लेखाची जबाबदारी पुस्तक आणि बरच काही संस्थापन आणि संपादक मंडळाजवळ असणार नाही.

***

या अंकात ..

* पांडुरंग - आश्विनी किशोर
* अक्षरपत्रे - प्रवीण कलंत्री
* कवितेची कविता - विक्रम चौधरी
* कला चित्र -ओमकार भोसले
* उगाच कशाला ? -जितु भुमकर
* संघर्षाची अपरिहार्यता -प्रीती के.
* एकांत - परशुराम राऊळ
* निखारा - हर्षरंग
* आयुष्यभराची साथ - रसिका
* निवडणूक - हर्षरंग
* गावांची शहरे होताना... - शिवाजी सांगळे
* हरवलेलं गाव - तन्वी राऊत
* वहिवाट ... - शिवाजी सांगळे

॥ पांडुरंग ॥

शांती मनी भेटे । विठ्ठलाच्या ठायी ॥
चालले ते पायी । वारकरी ॥१॥

मुखी हरी नाम । भजनात दंग ॥
माझा पांडुरंग । मायबाप ॥२॥

नसे ती उसंत । चढण्यास घाट ॥
भक्तीची ही वाट । मोक्षप्राप्ती ॥३॥

आनंदी सोहळा । भेटीचा रंगला ॥
भजनी दंगला । नामातुका ॥४॥

आषाढी कार्तिकी । पंढरपुरात ॥
विठ्ठल उरात । नित्यवसे ॥५॥

ज्ञानोबा तुकोबा । नामाचा गजर ॥
भक्तीत हजर । हरीनाम ॥६॥

आशू म्हणे आता । विसाव्याचे क्षण ॥
सोनियाचा दिन । एकादशी ॥७॥

~~ सौ.आश्विनी किशोर
पांडीकाड, केरळ
ashvinikishor045@gmail.com

✻अक्षरपत्रे

काही लोकांना वेगवेगळ्या प्रकारचा संग्रह करण्याचा छंद असतो. पोस्टाची तिकिटे,बाप्पाच्या मूर्ती,किंवा बापाचे फोटो, नाणी,नामवंत-तांच्या स्वाक्षऱ्या, जुन्या गाण्यांच्या कॅसेट्स, रेकॉर्ड्स, असं काही काही संग्रह करत असतात.

ऐसी अक्षरे मेळविन..!

चंद्रकांत कोकितकर हे ग्रहस्थ साहित्यिकांच्या अक्षरांचा संग्रह करतात. त्यांच्याकडे आत्तापर्यंत पाचशेहून अधिक साहित्यिकांची पत्रे आहेत.लहानपणापासूनच त्यांना वाचनाची आवड होती. कौटुंबिक परिस्थिती साधारण असूनही मिळेल तिथे कथा कादंबरी कविता लेख नाटक असं विविध साहित्य वाचन करीत. वाचता वाचता लेखकांना पत्र लिहून आपला अभिप्राय कळवावा अशी इच्छा मनात आली . कुसुमाग्रजांचा विशाखा वाचल्यावर प्रथम त्यांनी कुसुमाग्रजांना पहिले पत्र लिहिले. महिन्याभरानंतर कुसुमाग्रजांच्या हस्ताक्षरातच त्यांना पत्र मिळाले त्या पत्रावरची तारीख होती ३१ डिसेंबर १९९६.

कुसुमाग्रजांनी त्यांची दखल घेऊन चांगल्या साहित्याचे वाचन करीत रहा असा संदेशही दिला. हर्षभरीत होऊन त्यांनी पुस्तक वाचून झाल्यावर लेखकाला पत्र लिहून पुस्तकावरील अभिप्राय पाठवण्याचा छंद लागला. तेव्हापासून आजतागायत पुस्तक वाचन झाल्यावर ते लेखकांना त्यांचा अभिप्राय पत्र लिहून कळवतात.

लेखकही पत्र पाठवून त्यांची दखल घेत कौतुक करायचे. कुसुमाग्रजांनंतर य.दि.फडके, श्री. ना. पेंडसे, ना.स.इनामदार, गंगाधर गाडगीळ, मंगेश पाडगावकर, विंदा, शिवाजी सावंत, आनंद यादव, रत्नाकर मतकरी, रणजित देसाई, पु.भा.भावे, पु ल देशपांडे गो. नी. दंडेकर अशा अनेक मान्यवरांची पत्रे ही त्यांच्या संग्रही आहेत.

पूलंनी त्यांना पाठवलेल्या पत्रात लिहिलय, "हस्ताक्षर संग्रहासाठी पत्र मागितले की माझ्या छातीत धडकी भरते एक तर माझे हस्ताक्षर सतराशेसाठ प्रकारचे येते, हस्ताक्षरावरून माझा स्वभाव निदान वीस पंचवीस प्रकारचा आहे असे ठरवता येईल. "

कविवर्य मंगेश पाडगावकरांनी अत्यंत अर्थ गर्भ अशा ओळी लिहून पाठवले आहेत "ज्यांची हृदय झाडाची त्यांनाच फक्त फुले येतात." मराठी राजभाषा दिना निमित्ताने लांजा येथे लोकमान्य वाचनालयातर्फे या अक्षर संग्रहाचे प्रदर्शन करण्यात आले. हा अनमोल असा साहित्याचा खजिना श्री चंद्रकांत कोकितकरांनी आपल्या छोट्याशा घरात संग्रहित केलेला आहे हा खजिना नक्कीच विद्यार्थ्यांना व रसिकांना उपयुक्त व मार्गदर्शक ठरणारा आहे.

श्री चंद्रकांत कोकितकर हे मूळचे कोल्हापूर मधील चंदगड तालुक्यातल्या कुदनूर गावचे. घरच्या गरिबीमुळे बारावीनंतर त्यांना शिक्षण सोडून द्यावे लागले. उदरनिर्वाहासाठी त्यांनी गावातच किराणामालाचे दुकान टाकले पण न चालल्यामुळे ते दुकान बंद करावे लागले.

मुंबई, गुरुवार दि. ७ ऑक्टोबर २०१०

ऐसी अक्षरे रसिके... मिळवीन

२००८ च्या आसपास ते मुंबईत आले प्रथम त्यांनी सांताक्रुज पूर्व येथील पालिका विभाग कार्यालयाच्या कॅन्टीनमध्ये वेटर म्हणून काम करायला सुरुवात केली.नंतर काही काळ वॉचमनचे काम केले. आता ते गावी एका कारखान्यात कार्यरत आहेत. ह्या धकाधकीच्या काळातही त्यांच्यातला वाचक, लेखक जीवंत होता.

सर्वच वाचक लेखक होतातच असे नव्हे, पण कोकितकर याला अपवाद आहेत. त्यांना लेखनाची सुद्धा आवड असून काही नियतकालिकात त्यांचे लेख प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांचं एक कवितासंग्रह ही प्रकाशित झालेला आहे.शिवाय ते गेल्या काही वर्षांपासून साहित्य समृद्ध असा "ताम्रकाठ " हा दिवाळी अंक संपादन करुन प्रकाशित करतात.

- लेखक : प्रवीण कलंत्री

****

✻ कवितेची कविता..!!

आनंद शोधू पाहता
ओझरत दुःख येते
मौनाची मग माझ्या
हलकेच कविता होते..

सुखाचे कवडसे आणते
कधी मायेचा पाऊसही
उबदार करत घर माझे
माझे अस्तित्व होते..

सोहळा कधी गर्दीचा
कधी एकतांची गाणी
कधी होत शब्द ती
कधी शब्दातीत होते..

माझे मला कळेना
कुठून हे उगवते
पेरले कधी जाते
अन् हाताशी कधी येते..

- विक्रम चौधरी
vikram.choudhari@gmail.com



मराठी मालिका, नाटक आणि चित्रपट, इतकंच नव्हे तर हिंदी मालिका आणि चित्रपटातूनही प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन करणारे अभिनेते अतुल परचुरे यांचे निधन झाले आहे. वयाच्या ५७व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला आहे.

कलाचित्र : ओमकार भोसले

✻ उगाच कशाला ?

नकोस आठवू मला, आणि नाही आठवत मी ही तुला..
रमण्याचे, सोबत जगण्याचे बहाणे उगाच कशाला?
वचनांची रास जी लावली, ती अशीच दिमाखात राहू दे,
त्याची पूर्तता करावी हा अट्टाहास उगाच कशाला??

विश्वासाची तळपती समशेर तू माझ्याच पाठी रोवली,
हरपल्या त्या धारेस इमानीची आस उगाच कशाला?
विरघळला विरह काळाच्या डोही, तो असाच विरघळू दे,
अंतरीच्या ओढीला प्रवासाचे वेध उगाच कशाला??

मनाच्या दर्पणी जरी, उमटले मुखकमल तुझे आजही
ते पाहण्याचे, तुला न्याहाळण्याचे वेड उगाच कशाला?
श्वास थरथरला, प्रीत गंधात आता जीव कोंडला ,
बाहुपाशात बंदिस्त होण्याचा मोह उगाच कशाला?

बघ क्षितिज रोखूनी, मावळला भास्कर आपुल्या प्रितीचा..
तिमिरात ही जगूनी पाहू, उगाच आशेचा किरण कशाला?
तुझ्यासवे, तुझ्याविना माझ्या काव्याला गंध अपूर्णत्वाचा ,
डोळ्यांत दाटतील आसवे तो शब्द कवितेत उगाच कशाला?

-जितु भुमकर (पुणे)
Twitter: @Jitu_Likhit

✻ संघर्षाची अपरिहार्यता



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वरील Quote चा मराठी अर्थ, "गमावलेले अधिकार कधीच दडपशाही करणाऱ्यांच्या नैतिकतेला आवाहन करून कधीच मिळवले जात नाहीत, तर त्यासाठी अखंड संघर्ष आवश्यक असतो..... शेळीचा वापर बलिदानासाठी केला जातो, सिंहांचा नाही." डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हा Quote माणसाला खोलात जाऊन विचार करायला भाग पाडतो, कारण आजपर्यंत आपण स्वातंत्र्येतेला केवळ भावनिक दृष्ट्या पाहत असतो.

परंतु, इतिहासात डोकावले तर आपल्याला दिसेल की अत्याचार करणाऱ्यांच्या नैतिकतेकडे किंवा भावनिकतेकडे पाहून स्वातंत्र्य मिळत नाही. इतिहासात असे वारंवार सिद्ध झाले आहे की ज्या लोकांना सत्ता किंवा फायदा मिळत असतो, ते तो सहजासहजी सोडून देत नाहीत, कारण सत्ता मिळवणे त्यांचा एकमेव अजेंडा असतो.

इतिहासातील काही उदाहरणे घेतले तर, फ्रेंच राज्यक्रांती मध्ये आपल्याला दिसून येईल की, या क्रांतीने साम्राज्यवादी राजेशाहीच्या विरोधात लोकांनी लढा दिला. लोकांनी शस्त्र उचलली, राजवाडे तोडले, आणि संपत्तीचे केंद्रीकरण मोडून काढले. इथे आपल्याला लक्षात घ्यावे लागेल नैतिक आवाहन करून हा बदल साध्य झाला नाही, तर तो प्रत्यक्ष लढा हिंसा आणि रक्तपाताच्या माध्यमातून घडवला गेला. अमेरिकेत देखील गुलामी प्रथा संपुष्टात आणण्यासाठी, विशेषतः दक्षिणेत, सैद्धांतिक चर्चा किंवा नैतिक आवाहन पुरेसे नव्हते. कारण, गुलामांचे शोषण करणाऱ्यांनी ते संपवण्यासाठी सहकार्य केले नाही. यावर देखील युद्धच शेवटचा पर्याय ठरला आणि त्यामुळेच गुलामीचा अंत होऊ शकला.

भारतातील स्वातंत्र पूर्वीच्या युद्धाचे उदाहरण घेतले तरी, वरील बाबींचे आपल्याला महत्व कळेल. ब्रिटिशांनी एकोणिसाव्या शतकात त्यांच्या वसाहतवादी धोरणांचा प्रभाव आदिवासी क्षेत्रात वाढवला. परिणामी, त्यांच्या जमीनी आणि संसाधने काढून घेण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर सुरू झाले. हे अन्याय सहन न करता संथाळ आणि भील आदिवासींनी याविरुद्ध सशस्त्र संघर्ष उभारला. आदिवासी लोकांनी ब्रिटिशांकडून झालेल्या शोषणाला त्यांनी नैतिकतेच्या आधारावर हरवण्याचा प्रयत्न केला नाही, उलट त्यांनी आपल्या अस्तित्वासाठी प्रत्यक्ष हिंसक लढ्यांचा मार्ग निवडला. यामुळेच इ. स. 1818 मधील भील विद्रोह आणि इ. स. 1855 मधील संथाळ बंड आणि यासारख्या आदिवासी उठावांनी ब्रिटिश सरकारला त्यांचे काही काळ नियंत्रण गमवावे लागले.

आदिवासी लोकांच्या संघर्षातून सिद्ध हे होते की, जिथे नैतिक संघर्ष अपयशी ठरले, तिथे प्रत्यक्ष लढा हाच पर्याय ठरला. भारताच्या स्वातंत्र्याला प्रचंड अवकाश बाकी असताना, आदिवासींचा आदिवासींसाठी ब्रिटिश साम्राज्यवादाविरुद्धचा लढा देखील आपल्याला बाबासाहेबांच्या विचारांचे प्रत्यंतर देतो. महात्मा फुलेंचे उदाहरण घेतले तर दिसून येईल की, त्यांनी शोषणाकारी जात व्यवस्थेचा आणि उच्चवर्णीय सर्वण ब्राह्मण वर्चस्वाचा कडाडून विरोध केला. फुलेंनी 'गुलामगिरी' पुस्तकातून वर्चस्वावर आणि सामाजिक शोषणावर थेट प्रहार केला. महात्मा फुले देखील केवळ नैतिकतेच्या आधारावर समाज बदलू इच्छित नव्हते तर, त्यांनी शिक्षण, विचारांची स्पष्टता आणि संघटनाच्या माध्यमातून प्रत्यक्ष संघर्षाचा कठिण मार्ग स्वीकारला. महात्मा फुलेंच्या आयुष्यातील महत्वाचा आणि ऐतिहासिक लढा म्हणजे 'न्हावीं'चा संप. न्हावींचा संप हा एक असा ऐतिहासिक लढा होता ज्याने शोषण करणाऱ्या जातिव्यवस्थेला धक्का दिला.

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले

इ. स. 1865 मध्ये महात्मा फुलेंनी स्वतःच्या नेतृत्वाखाली न्हावी समाजाला संघटित करून या संपाची सुरुवात केली. फुलेंनी न्हाव्यांना आणि इतर शूद्र वर्गांना समजावले की ब्राह्मणांनी त्यांना केवळ शोषणाच्या जोखडाखाली ठेवले आहे. प्राचीन काळापासून विधवा केशवपन ही प्रथा हिंदू धर्मात चालत आली होती. या प्रथेनुसार पतीच्या मृत्यूनंतर स्त्रियांची डोक्यावरील सर्व केस कापून टाकली जात, जेणेकरून तिने आयुष्यभर तपस्वीनीप्रमाणे जगावे. समाजाकडून विधवा स्त्रियांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जात आणि कायम त्यांना बंधनात ठेवले जात.

केस कापण्याच्या या प्रथेमुळे विधवा स्त्रियांना मोठ्या अन्यायाचा सामना करावा लागत असे. त्याचदरम्यान विधवा केशवपन आणि पुरुषांच्या हजामतीचे दर वाढवण्याच्या प्रकारामुळे न्हावी समाजात वाद निर्माण झाला. न्हावी समाजाचे काम विधवांचे केशवपन करणे आणि पुरुषांची हजामत करणे हे दोनच कामे होती. या दोन कामातून मिळणाऱ्या पैशांवर त्यांचा उदरनिर्वाह अवलंबून होता. न्हावी समाजाचे चाललेले आर्थिक द्वंद्व महात्मा फुलेंसाठी सामाजिक सुधारणा करण्यासाठी एक वैचारिक संधी ठरली आणि त्यांनी या संपाची दिशाच बदलून टाकली. फुलेंनी न्हावी समाजाला समजून सांगितले, विधवा केशवपन ही प्रथा केवळ आर्थिक प्रश्न नाही, तर स्त्रियांवरील एक गंभीर सामाजिक अन्याय आहे. त्यांनी न्हावी समाजाला या प्रथेची अमानुषता आणि क्रौर्य याविषयी जागरूक केले.

फुल्यांच्या मार्गदर्शक विचाराने न्हावी समाजाने देखील स्त्रियांच्या शोषणाविरुद्ध आवाज उठवला आणि विधवांचे केस न कापण्याचा निर्णय घेतला. त्याचबरोबर उच्चवर्णीय ब्राह्मणांची कामे करण्यास स्पष्टपणे नकार दिला. हा संप इतिहासात अतिशय महत्वाचा ठरला. कारण, जातीय शोषणाच्या विरोधात लढण्याचा प्रत्यक्ष प्रयत्न होता. उच्चवर्णीय लोकांनी न्हावी समाजाला असंख्य धमक्या दिल्या, त्यांचा संप मोडून काढण्याचा प्रयत्न देखील केला, परंतु महात्मा फुलेंच्या मार्गदर्शनाखाली न्हावी समाजाने ठामपणे आपला संघर्ष चालू ठेवला. न्हावी समाजाचा हा संप केवळ ब्राह्मणांच्या शोषणा विरोधात नव्हता, तर शोषित समाजाला आपले स्वातंत्र्य आणि हक्क मिळवण्यासाठी प्रत्यक्ष संघर्षाची गरज आहे, हा मोठा क्रांतिकारक संदेश त्या संपामागे होता. महात्मा फुलेंच्या मार्गदर्शनाखाली ह्या संघर्षातून दिसून येते की, फक्त नैतिक आवाहन किंवा सहानुभूतीवर अवलंबून न राहता, शोषकांच्या शोषणाच्या विरोधात संघटित आणि ठाम लढा उभारल्याशिवाय कोणताही खरा बदल साध्य होऊ शकत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्याच विचारांना सर्वात समर्पक दुसरे उदाहरण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील इ. स. 1927 मध्ये झालेला महाड सत्याग्रह. हा सत्याग्रह दलितांच्या आत्मसन्मानासाठीचा आणि समानतेसाठीचा निर्णायक लढा होता, ज्याने भारतातील सामाजिक न्यायाच्या चळवळीला एक नवा आयाम मिळून दिला. महाडच्या सत्याग्रहाने देखील सिद्ध केले की, दडपणाऱ्या व्यवस्थेच्या नैतिकतेवर आधारित आवाहन करून शोषितांना न्याय मिळत नाही.

शोषितांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागला म्हणजे आपण विचार करू शकतो, इथल्या शोषितांची काय परिस्थिती असेल. इ. स. 1923 मध्ये महाडच्या नगरपालिकेने एका निर्णयाद्वारे घोषणा केली की चवदार तळ्यावरून कोणत्याही व्यक्तीला, जात-पात न पाहता, पाणी घेण्याचा अधिकार असेल. परंतु, प्रत्यक्षात या निर्णयाची कुठेही अंमलबजावणी होत नव्हती. त्यामुळे, हा प्रश्न सार्वजनिक चर्चेचा विषय बनला. जवळपास 10,000 अधिक लोकांना, दलित बांधवाना सोबत घेऊन बाबासाहेबांनी 20 मार्च 1927 रोजी महाडचा सत्याग्रह केला. या ऐतिहासिक क्षणी सार्वजनिक पाणवठ्यावरून दलितांनी पाणी घेतले आणि समानतेचा अधिकार घोषित केला. उच्चवर्णीय लोकांनी या लढ्याला प्रचंड विरोध केला, दलित वस्त्यांवर हल्ले करण्यात आले, जातीवादी लोकांच्या भ्याड हल्ल्यामुळे कितीतरी लोकांचे नुकसान झाले.

बाबासाहेबांनी आपल्या बांधवाना एका जरी शब्दाने म्हटले असते, या लोकांना आल्या पावली माघारी फिरू द्यायचे नाही, तर महाडचा इतिहास रक्तलाछित रक्त तळ्याचा इतिहास झाला असता. मानतवतादी बाबासाहेबांनी असे केले नाही. बाबासाहेब आक्रमक पवित्रा घेऊ शकले असते,

परंतु त्यांची आक्रमक पवित्रा घेण्याची पद्धत वेगळी होती. न मिळत नसलेल्या पाण्यासाठी त्यांनी त्याच लोकांचे पाणी अडवत बसले नाहीतर, मंत्री झाल्यानंतर भविष्यातील गरज ओळखून पाणी पिण्यासाठी, शेतीसाठी, उद्योगासाठी योग्य 'जल नियोजनाचा' पाया घातला. दलितांच्या आत्मसन्मानासाठी, मानवी हक्कांसाठी, आणि सामाजिक न्यायासाठीचा हा व्यापक संघर्ष, दलितांच्या इतिहासाला कलाटणी देणारा ठरला. बाबासाहेबांनी म्हटल्याप्रमाणे, शोषक वर्ग नैतिकतेच्या आवाहनावर किंवा सहानुभूतीच्या भावनेवर आपली सत्ता सोडत नाही. महाड सत्याग्रहाने हे सिद्ध केले की बाबासाहेबांनी फक्त नैतिक आवाहन न करता प्रत्यक्ष संघर्ष केला. सार्वजनिक पाणवठ्याचा वापर करण्याचा हक्क केवळ कायदेशीर किंवा भावनिक मागणीने मिळाला नाही, तर तो सत्याग्रहाच्या माध्यमातूनच प्राप्त झाला.

इ. स. 1970 मध्ये राजा ढाले, नामदेव ढसाळ यांनी स्थापन केलेल्या दलित पँथरने प्रत्यक्ष क्रांतिकारक मार्गाने संघर्षाचा आवाज उठवला. त्यांनी दलितांचे अन्याय-अत्याचार सहन करण्याऐवजी प्रत्यक्ष लढ्याचा संदेश दिला आणि केवळ नैतिकतेवर आधारित लढाई न लढता, दलितांच्या प्रत्यक्ष हक्कांसाठी संघर्षाचा मार्ग खुला केला. महाड सत्याग्रह आणि दलित पँथर सोबतच, बाबासाहेब आंबेडकरांच्या नावावरून झालेल्या नामांतर लढ्याची घटनाही तितकीच महत्वाची आहे.

मराठवाडा विद्यापीठाला बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने नामांतर करण्यासाठी दलितांनी मोठा संघर्ष केला.

या लढ्यात, अनेक आंदोलने, उपोषणे, आणि प्रचंड जनआंदोलने झाली. कोल्हापूर विद्यापीठाचे, छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ नाव बदलताना, पुणे विद्यापीठाचे सावित्रीबाई फुले विद्यापीठ नाव बदलताना कोणताही विशेष विरोध झाला नाही. परंतु, बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देताना विशेषतः उच्चवर्णीय गटांचा तीव्र विरोध का झाला? उच्चवर्णीय लोकांच्या तीव्र विरोधामुळे दलितांची अख्खी एक पिढी या आगीत होरपळून निघाली. तीव्र संघर्षाच्या काळात इ. स. 1978 - 1994 दरम्यान बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने नामांतर करण्यासाठी दलितांनी आणि आंबेडकरवाद्यांनी तब्बल 16 वर्षे संघर्ष केला. हे केवळ नैतिक आवाहन नव्हते, तर त्यासाठी प्रत्यक्ष आंदोलन, उपोषण, निदर्शने आणि राजकीय दबाव वापरण्यात आला. शेवटी, प्रचंड संघर्षानंतर 1994 मध्ये यश मिळाले आणि मराठवाडा विद्यापीठाला बाबासाहेबांचे नाव मिळाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या Quote चा सर्वार्थाने विचार करण्यासह, बाबासाहेब म्हटले होते, दडपणारी व्यवस्था नैतिक आवाहनावर कधीच बदलणार नाही, त्यासाठी प्रभावी संघर्ष, दबाव, आणि तर्कच समाजातील बदल घडवू शकतात. त्यांनी हेही सांगितले की केवळ आरक्षण, कायदे किंवा निर्णय नाहीत तर शोषितांनी सातत्याने संघर्ष करूनच शोषक वर्गाच्या सत्तेला आव्हान दिले पाहिजे आणि अशा संघर्षांची गरज आजही आहे, कारण जिथे शोषण चालू आहे तिथे केवळ तात्पुरता बदल नको, तर मूलभूत बदल हवा असतो. त्यामुळे, शोषक वर्गाकडून नैतिकतेची अपेक्षा करणे, ही एक प्रकारे त्यांच्याकडून सहानुभूती मिळवण्याचा निष्फळ प्रयत्न ठरतो. सातत्यपूर्ण संघर्ष हाच एकमेव मार्ग आहे ज्याद्वारे शोषणकारी व्यवस्थांना बदल घडवता येतो. बाबासाहेबांचा हा विचार आपल्याला पुन्हा एकदा आठवण करून देतो की, संघर्ष हा स्वातंत्र्य मिळवण्याचा आणि शोषणाचा अंत करण्याचा मुख्य मार्ग आहे. संघर्षाशिवाय शोषितवर्गाला कधीच आपले हक्क मिळाले नाहीत, आणि हेच इतिहास वारंवार सिद्ध करतो.

~Preity K 🦋

✻ एकांत !!

एकांत खायला उठतो
भूक त्याची भागत नाही
तेव्हा आरसा होतो मित्र खोटं
तो बोलत नाही

बारीक बारीक आवाज मोठा
होऊन ऐकायला येतो
एकटा राहण्याचा माज
तेव्हा मात्र निघून जातो

विचाराच्या गर्दीत
हरवतो स्वतःला
मनातली ओ
ऐकू येते का कोणाला ?
सेंकंद काट्याने केली मैत्री
तास काट्याशी
कॅलेंडरची पान पंख्याच्या हवेने
पलटत्यात उलटली तिशी

मनाच्या वहीत सर्व काही लिहितो
भितींमधल्या कानांना ते मी ऐकवतो
अंधार डोळ्यात, डोळे उघडे असो कि बंद
सोबतीचा हात मिळेल का ?

एकटा नाही राहायचा माझा छंद
एकांत खायला उठतो
भूक त्याची भागत नाही
तेव्हा आरसा होतो मित्र खोटं
तो बोलत नाही

- परशुराम राऊळ

parshuramother@gmail.com

✻ निखारा

व्यथा जाळून कधी कुठे संपतात
शब्दांचे निखारे तर अनंत आहे

आनंद वाटून घेतला पाहिजे
देहाचा पुतळा नाशवंत आहे

सांगायचा राहिला शेवटचा निरोप
मनाला बोचणारी ही खंत आहे

रस्त्याने जाताना तू समोर यावे
क्षण तोच खरा भाग्यवंत आहे

स्वप्नांना रात्री भेटले पाहिजे
बोलण्यास आता उसंत आहे

प्रेमाच्या नात्यात वणवा पेटतो
प्रीतीच्या चक्रातील हा वसंत आहे

- हर्षरंग
harshadpotdar24@gmail.com

✻ आयुष्यभराची साथ

प्रेमात झुकतं माप घ्यायला कसला आलाय
SELF-RESPECT
मनापासनं लळा लावला कि नातं जपलं
जातंच

साथीदार चुकतो म्हटल्यावर आपण हि
तसंच वागणं प्रेम नसतं
नात्यात दुजाभाव करणं बरोबरीचं नाही
रुसणं,फुगणं आयुष्यभराचे साथीदार असले

तरी त्यांच्या जोडीनं गोड अशी
प्रेमाची समजूत असणं तितकंच महत्त्वाचं
साथीदाराची सोबत हि अशीच हवी
थोडी आंबट, थोडी तिखट असावी पण
आयुष्यभराची साथ मात्रं गोडव्यानेच व्हावी

-रसिका

✻ निवडणूक ..!!

मोठ्या घोषणांचा पाऊस
दिवसरात्र पडतं आहे
निवडणुकीचा हंगाम
बघा सुरू होतं आहे

ह्या पक्षातून त्या पक्षात
पुढारी उड्या मारत आहे
हुशार झालेली जनता
धडा शिकवणार आहे

सगळ्यांना लाडकं म्हणतं
सरकार गोंजारत आहे
एका हाताने पैसे देऊन
मागून खिसा कापत आहे

अचानक सगळे नेते
लोकांची सेवा करत आहे
युती आघाडी टोळी करून
सत्तेचा मेवा लुटत आहे

आता पुढचे काही दिवस
मतदार राजा आहे
एकदा मत दिल्यानंतर
जोरात बँड बाजा आहे



- हर्षरंग
harshadpotdar24@gmail.com

✻ गावांची शहरे होताना...

रात्री नऊ सवानऊची अंधारलेली वेळ, त्याने सांगितल्या प्रमाणे आम्ही मोहोळ टोल नाक्याच्या अलीकडे गाडी थांबवली, नजर त्याला शोधत असतांना समोर तो मोटारसायकल सोबत दिसला, मी खाली उतरून त्याच्या जवळ गेलो, तेव्हा आम्ही दोघ पहिल्यांदाच एकमेकांना भेटत व पहात होतो. तो म्हणाला "आपल्याला हायवे सोडून साध्या रस्त्याने जावं लागेल, मी मोटारसायकलवर पुढे होतो, तुम्ही मागोमाग या". हायवे सोडून गावाच्या साध्या वाटेला लागलो तेव्हा भोवताली किर्र अंधार, पाठीमागेरस्त्यावर सुसाट धावणाऱ्या वाहनांच्या टायरचा रो रो आवाज, आणि समोर गाडीच्या प्रकाशात फक्त बैलगाडीच्या चकारीच्या खुणा व दुतर्फा वेगवेगळ्या आकारांत असलेली छोटी छोटी झुडपं दिसत होती.

गाडीमधे सोबत पत्नी व मोठा मुलगा जो गाडी चालवत होता, आमची आपसात चर्चा... मनात अनेक शंका निर्माण करीत होती, कारणही तसेच होते, एकतर समोरच्या व्यक्तीबद्ल मला इतर कसलीही माहिती नव्हती, नीटशी ओळखपाळख देखील नव्हती, त्यातच अनोळखी गाव,रात्रीची वेळ...! आपण त्याच्या मागे जावून चुक तर करीत नाही ना? ईत्यादी शंकाचे 'मोहळ' उठलेले.

इतक्यात एके ठिकाणी चकारीच्या मध्य भागाचा गाडीला धक्का लागला, गाडी थांबली तसा तो मोटारसायकल वरून उतरला व खिशातून बँटरी काढून गाडीखाली वाकून पाहून म्हणाला, "दादा काही काळजी नका करू, गाडी थोडी मागे घ्या व सावकाश एका बाजूने या, जमेल" या एका वाक्याने मनात आलेल्या अगोदरच्या शंकाना थोपवायचं थोडसं काम केलं. जवळपास चार कि.मी. वर तो थांबला, अंधारात नीटसं समजलं नाही पण बरंच मोठं घर, दोन तीन दांडगीकुत्री, घरासमोर दोन जर्सी गाया दिसल्या, घराच्या एका बाजूला झापा खाली दहा पंधरा शेरडया होत्या.

थंडीची जाणीव होत असतानाच त्याने घरातल्यांशी आमची ओळख करून दिली. हात पाय धुवायला बाहेर येऊन पाहतो तर आसपास सर्व मोकळं रान... त्यांचच एकमेव घर, दुसरं काहीच नाही, पुन्हा मनात शंका फेर धरू लागल्या. जेवण होई पर्यंत पाऊने अकरा वाजले, दहा पंधरा मिनिटांनी अंथरुणावर अंग टाकलं, मला तर झोप लागण्याचा प्रश्नचनव्हता, मनात नुसता विचारांचा थयथयाट सुरु असतांना, तो माझ्या शेजारी बसला. दिड एक तास गप्पा मारून तो झोपायला गेला, मी मात्र जागाच, बैचेन मनाने, उशीरा जरा डोळा लागला खरा, तेंव्हा समोरचा दरवाजा उघडून एकजण घरात आला, तो माझ्याकडे पाहून हसला, मी सुद्धा स्मित केल. तो बाजूच्या खोलीत गेला, टेन्शन मधे असतानाच मोबाईलच्या घडयाळात पाहिलं, पहाटेचे सव्वाचार वाजले होते.

आता पर्यंतच्या कथेतल्या 'त्या" ला वाचनाची प्रचंड आवड,जे मिळेल ते वाचायचं. अशातच मी लिहिलेली एक कथा "चिमणी" त्याच्या वाचनात आली, ती आवडली हे सांगण्यासाठी त्यानं मला फोन केला आणि त्यावेळे पासून आमची व्हर्च्युअल ओळख झाली. अधुनमधून फोन येत जात राहिले, आमंत्रणांची देवाणघेवाण देखील. प्रत्यक्षात कधी भेट होईल हे दोघांच्याही स्वप्नी नव्हते. त्याचं शिक्षण केवळ आठवी, व्यवसाय शेती, घरात आजी, आई, वडील सौदागर रन्नाप्पा पवार, थोरला भाऊ तेजस, त्याची पत्नी, पुतण्या व पुतणी एवढा परिवार असलेला 'तो' म्हणजे शिवाजी सौदागर पवार उर्फ बाळू. योगायोगाने आम्ही दोघं नावकरी निघालो.

श्री स्वामीं समर्थाच्यादर्शनासाठी अक्कलकोट येथे सहकुटुंब जावं, असं गेले कित्येक वर्षे नुसतचं ठरवित होतो, परंतु योग जुळून येत नव्हता, पण एक तारखेला अचानक नक्की झालं व धाकटया मुलाला सुट्टी नसल्यानं आम्ही तीघंच निघालो, पहिला मुक्काम फलटण येथे करून दोन तारखेला अक्कलकोट येथे पोहचलो, तेव्हा लक्षात आलं कि उद्या श्री दत्त जयंती आहे, त्यामुळे अक्कलकोटला भक्तांची व वेगवेगळ्या ठिकाणच्या पालख्यांची खुप गर्दी वाढत आहे तशात राहण्याचे अगाऊ आरक्षण नसल्याने या गर्दीत आपली काय सोय होईल हे सांगता येत नव्हतं, म्हणून स्वामींचं दर्शन घेऊन लगेच माघारी निघण्याचा निर्णय घेतला. तत्पूर्वी शिवाजीशी बोलणं झालं होतं, पण मुक्कामी वगैरे येतो असं काही ठरवलं नव्हतं. सरतेशेवटी आपण त्यांच्याकडे जायचं ठरवलं व त्यानुसार आम्ही टोल नाक्याच्या अलिकडे भेटलो.

फेसबुक, वॉट्सअँप सारख्या आभासी जगात सुद्धा असे काही सुखद अनुभव येवु शकतात याचचं नवल वाटतं. कारण गेल्या वर्षी कोकण दौऱ्यावर असतांना, एरवी नित्य संपर्कात असणाऱ्या एका मित्राला फोन केला तर त्याने साधी भेटण्याची सुद्धा तसदी घेतली नाही. असो,व्यक्ती तितक्या प्रकृती म्हणतात हेचं खरं. खैर, इथे मात्र फारच वेगळा पुन्हा पुन्हा घ्यावा असा, जगण्याची नवी कला शिकविणारा अनुभव मिळाला, महत्त्वाचं म्हणजे गेलो होतो केवळ एकटया शिवाजीला भेटायला पण त्याच्या कडे तर जीव लावणारं अख्खं कुटुंब व अनेक प्रेमळ माणसं मिळाली.

सकाळी पवार कुटुंबियांच्या तुलनेत आम्ही जरा निवांतच उठलो, आन्हिकं उरकून बाहेर येऊन समोर पाहतो तर आंबटगोड बोरांनी डवरलेलं छानसं झाड दिसलं, सभोवार मन हरखून जाईल अशी छान हिरवीगार शेती दिसत होती, त्यात पालक, मिरच्या, कारले, घेवडा, कांदा, गवारीच्या शेंगा, लिंबू,कांद्याची पात, कोथिंबीर इत्यादी भाज्या होत्या, परसदारी शेवग्याची झाडे होती एकंदरीत फार प्रसन्न व अल्हाददायक, मन मोहवून टाकणारं, शहरीभागात शोधून सापडणार नाही असं हवं हवंस वातावरण होतं.

आम्ही परतीच्या प्रवासाची तयारी करू लागलो होतो. दरम्यान शिवाजी दिड कि.मी. अंतरावर चहासाठी दुध आणायला गेल्याच समजलं, तो पर्यंत घरातील मंडळींना खास करून त्याच्या आजी व आईला एक प्रश्न सतावत होता, ते म्हणजे शिवाजी सोबत तुमची ओळख कशी काय झाली? तेव्हा माझ्या पत्नीने त्यांना आमच्या दोघाच्या आवडी संबंधी सविस्तर सागितलं, ते ऐकून दोघींना त्यांचं कौतुक मिश्रित आश्चर्य लपवता आलं नाही. दुध आल्यावर चहा झाला. दरम्यान महिला मंडळ न्याहरीच्या तयारीला लागलं होतं. सौदागरदादा नातवंडांना खेळवता खेळवता माझ्याशी गप्पा करीत होते, माझा मुलगा व शिवाजी यांची चांगली भट्टी जमलेली, एकिकडे आजी माझ्या पत्नीला पोक्त पणे अनुभवाच्या, संस्काराच्या चार गोष्टी सांगत होत्या, तेव्हा असं वाटलं, अरे हि आपलीच आजी आहे कि काय? केवळ काही तासांच्या सहवासात असा जिव्हाळा, एवढी आपुलकी? खरोखर दंडवत त्या माऊलीला व सर्व पवार कुटुंबीयांना. शिवाजीचीआई व भाऊ यांनी शेतातून आठवडाभर पुरेल ईतका रानवसा आणला, नेमके त्याच वेळी शिवाजीचे मामा त्यांना भेटायला आलेले, त्यांनीही सोबत आणलेल्या मेथी व शेपूच्या भल्या थोरल्या पेंढया नको नको म्हणत असता आमच्या स्वाधीन केल्या.

आवराआवर होईपर्यंत न्याहरी तयार झाली होती, मोड आलेल्या गावठी चण्याची उसळ, खर्डा, लोणचं आणि मुंबईच्या तुलनेत चारास एक अशी चपाती. पोटभर नास्ता झाला, तरीही सोबत घेऊन जाण्यासाठी आई सात आठ चपात्या व त्यावर खर्डा फडक्यात बांधू लागल्या,

आम्ही नको म्हणता निदान चार तरी सोबत न्या म्हणाल्या, तरीही नाही म्हणत असता "भरल्या घरातून रिकाम्या हाती जावू नये लेकीबाळीन" असं आजीनी दटावल्यावर आमची बोलती बंद झाली, मग महिलांचा हळदी कुंकवाचा कार्यक्रम सुरू झाला, सौ.आईनी कित्येक वर्षांचं नातं असल्या प्रमाणे देवासमोर बसवून माझ्या पत्नीची साडी चोळीने ओटी भरली, जणू त्यांचीच लेक सासरी जायला निघाली, हे सर्व पाहून माझं मन भरून आलं, आपसूकच आजींच्या पायावर आम्ही नतमस्तक झालो व त्याचा पोटभर आशीर्वाद घेतला. निघता निघता प्रत्येक जण हुर्डा खायला नक्की या असा आग्रह करायला विसरले नाहीत, आम्ही पण नक्की येऊ म्हटलं, साडेदहा वाजत आले, चकारीच्या वाटेपर्यंत शिवाजी सोबत आला, वाटेत ट्रँक्टर थांबवून ऊसाची चार कांड त्याने स्वच्छ करून दिली व पुन्हा या असं आग्रहाने सांगितलं, मी निशब्द, कृतज्ञतेने त्याची गळाभेट घेतली अन् तो माघारी फिरला.

घडयाळाच्या काटयावर धावणाऱ्या शहरातून हरवत चाललेली माणुसकी पहात असताना व गावांची शहरे होत असताना त्यात जिवंत असलेली, निराशा दूर करायला मदत करणारी, जीवन शिकवणारी माणुसकी दिसली. तुमचा एक छंद, एखादी आवड तुम्हाला कधी काय देऊन जाईल याचा काही नेम नाही. शिवाजीच्या वाचनाच्या म्हणा किंवा माझ्या लिखानाच्या छंदाने म्हणा आमची भेट घडवून आणली हे विसरता येणार नाही. फेसबुक, वाँट्सअँप सारख्या माध्यमांना सकारात्मकपणे पाहिलं तर खरोखर जग फार सुंदर आहे, नाही तर काहीच नाही. त्या मुळेच मला एवढं छान कुटुंब मिळालं हे कसं नाकारता येईल?

=शिवाजी सांगळे, बदलापूर, जि.ठाणे.

✻ हरवलेलं गाव..!!

“आमच्यागावी की नाही समुद्रआहे”, पुण्यात शिकत असताना अनू हे तिच्यामित्र-मैत्रिणींना अभिमानाने सांगत असे. मग तिचे मित्र-मैत्रिणीसुद्धा परीक्षा झाली की तिला तिच्यागावी घेऊन जाण्याचा आग्रह करीत. घरापासून दूर राहात असतानाघर आणि आपली माणसंयांच्या बरोबरीने अनूला गावच्या शांत, विस्तीर्ण समुद्रकिनाऱ्याचीही तितकीच आठवण येत असे.

लहानपणापासूनअनूला समुद्रकिनाऱ्यावर जायला खूप आवडत असे. त्याकाळी गावात हॉटेल्स, कॅफे, मॉल्स वगैरे काही नव्हतंच. त्यामुळे सुट्टीच्या दिवसांत आळीतल्या मित्र-मैत्रिणींसोबत आणि शहरांतून आलेल्याभावंडांसोबत मज्जा करण्यासाठी समुद्रकिनारा हे एकमेव हक्काचठिकाण असे. त्याकाळी समुद्रावर फिरायला जाणे म्हणजे भरतीच्या वेळी पाण्यात जाऊन मनसोक्त खेळणे, ओहोटी असेल तर किनाऱ्यावर क्रिकेट, पकडापकडी वा आंधळी कोशिंबीरसारखे खेळ खेळणे. कधीतरीउगाचच शांत बसून लाटांचा धीरगंभीर आवाज आपल्या मनात साठवत ठेवण्यातही एक निराळं समाधानअसे. पुढे कॉलेजच्या सुट्टीत जुन्या मित्र-मैत्रिणी भेटण्याचं हक्काचं ठिकाण म्हणजे हाच समुद्रकिनारा! खळाळत्यालाटा आणि अनू आणिगँगच्या गप्पांचा, खिदळण्याचाच काय तो आवाज. गावात कुणी कुणाला अपरिचित नसे.

मधूनच आळीतले एखादे आजी-आजोबा, काका-काकी किंवा शाळेतले शिक्षकसुद्धा सहकुटुंब समुद्रावर भेटत असत. सध्या कुणाचं काय सुरु आहेयाचा इतिवृत्तांत मग त्यांना सांगवालागे. कुणीतरी मग डब्ब्यांतून आणलेलेकुरमुरे नाहीतर चणे फुटाणे असासुका खाऊ बॅगमधून बाहेरकाढत. या खाऊचा डबाकधीच भरलेला परत गेल्याचं अनूलाआठवत नव्हतं.

"मॅडम घर आलं.", ड्रायव्हरच्या बोलण्याने अनू भानावर आली. आज वीस वर्षांनी ती गावात परत येत होती. लग्न होऊन अमेरिकेत स्थायिक झाल्यानंतर गाव मागे पडलं होतं. भारतात आली की तिचं वास्तव्य सासरी नाहीतर मुंबईला दादाकडेच असे. त्यामुळे आज इतक्या वर्षांनी गावी येऊन मनोमन ती आनंदली होती. पण तिचा हा आनंद काही वेळातच मावळला. तिची गाडी घराच्या दरवाज्यापाशी उभी होती. घरासमोरचं अंगण, अंगणातली कडुनिंब आणि आंब्याचे वृक्ष कुठे गेले असा प्रश्न तिला सतावू लागला. "अगं अनू मागच्या वर्षी घराचं काम काढताना मी म्हणालो नव्हतो का की रस्ता रुंदीकरणात मिळालेल्या एफएसआयमुळे आपल्याला एक मजला अजून वाढवता येणार आहे.", तिच्या चेहऱ्यावरचे भाव अचूकपणे ओळखत मयूर दादा म्हणाला. "असेल, मला लक्षात राहिलं नसाव", असं काहीसं तुटक उत्तर देत अनू घरात शिरली. नवीन घर अगदी प्रशस्त झालं होतं. अगदी आधुनिक सुखसोयींनी परिपूर्ण. "अगं अनू, आता आपल्या घरात ROचा प्लांटही आहे बरं का! त्यामुळे तुला इथे पाणी बदलल्याचा त्रासही होणार नाही", तिची वहिनी पाण्याचा ग्लास हातात देत उत्साहाने सांगत होती. दादाही तितक्याच उत्साहाने अनूला घर दाखवत होता. अनू शांतच होती. "काळाप्रमाणे बदलावं लागलं अनू. आईबाबांना अलीकडे गावाची सतत ओढ लागलेली असते, मग त्यांच्यासाठी महिन्यातून एकदोन फेऱ्या गावाकडे कराव्याच लागतात.

त्यामुळेहे घर ही गरजचझाली होती.", अनूच्या चेहऱ्यावरचे भाव टिपत दादानेपुन्हा तिला समजावण्याचा प्रयत्न केला. "खरंय! चांगले बदल गरज म्हणूनस्वीकारायलाच हवेत." दादाच्या समाधानासाठी अनू हे म्हणालीखरं, पण तिचं मनअजून भूतकाळातच घुटमळत होतं. घरासमोरचं प्रशस्त अंगण, तुळशी वृंदावन, घराच्या आजूबाजूला असलेले डेरेदार वृक्ष, तिच्या आईने हौसेने लावलेले विविधरंगी गुलाब, पारिजातक, जाई-जुई, यासर्वांत खुलून दिसणारं तिचं टुमदार कौलारू घर आणि घरातशिरल्या शिरल्या स्वागतासाठी सज्ज असेलला झोपाळा. भर उन्हातून घरातआलं की कसं थंडगारवाटायचं. त्याची कसर भरून काढायलाआता एसी आहे कीहॉल मध्ये! उगाच अनूच्या मनात विचार तरळून गेला.

जसजशी संध्याकाळ होऊ लागली तसतसंअनूला आपल्या जुन्या मित्राची, समुद्राची आठवण येऊ लागली. पायमोकळे करण्याच्या निमित्ताने अनूचे पाय समुद्राकडे वळले. फेरफटका मारण्याच्या निमित्ताने बाहेर पडलेल्या अनूला गावातले बदल आता प्रकर्षानेजाणवत होते. रविवार असल्यामुळे किनाऱ्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर आज जरा जास्तचवर्दळ होती. सर्व अनोळखी चेहरे, विविध भाषा बोलणारे. रस्त्याच्या दुतर्फा असणारी सुरुची झाडं आणि केतकीची बनंहीगायब झाली होती. त्यांच्या जागी आता छोट्या दुकानांनीघेतली होती. अगदी वडापाव पासून पिझ्झा पर्यंत सारं काही तिथे मिळत होतं. समुद्रावर जाऊन जुन्या आठवणींना उजाळा देण्याची अनूची कल्पना हवेतच विरली होती. भरती असूनही लाटापेक्षा चाटच्या गाडीभोवतीच्या लोकांच्या आवाजानेच किनारा दुमदुमून गेला होता. अगदी किनाऱ्याच्या सीमेलगत झालेल्या नवीन घरांमुळे तिला तिच्या नेहमीच्या जागाही आठवेनात. पावसाळ्यात येणाऱ्या मोठ्या भरतीचं पाणी नव्याने वसलेल्या या वस्तींत शिरूनये म्हणून किनाऱ्यावर संरक्षक भिंतही बांधली होती. येणारे-जाणारे लोकं तिच्या लाडक्या किनाऱ्याला 'बीच' असं संबोधत होते.

त्या 'बीच'वरच्या अनोळखी गर्दीत तिला गुदमरल्यासारखं झालं. तिचा आवडता समुद्रकिनारा, तिचं गाव आता सुप्रसिद्धपर्यटनस्थळ बनलं होतं, पण त्याचं निसर्गसौंदर्यआणि आपुलकीचा झरा मात्र कुठेतरीलुप्त झाल्याची लख्ख जाणीव तिला आता होत होती. किनाऱ्यावर फिरायला आलेले लोकं एकमेकांचे फोटो काढत होते, सेल्फी घेत होते. पणतिच्या आवडत्या किनाऱ्याचा जुना एकही फोटो तिच्यापाशी नव्हता. किनाऱ्याचं हे बदललेलं रूपमनातून पुसण्याचा प्रयत्न करत अनूचे पायघराकडे वळले.

-तन्वी राऊत

✻ वहिवाट ...

वाट्यास आलेला । क्षण रम्य व्हावा ।
जन्म तो सरावा । सेवेसाठी ।।

सामोरी जो येता । क्षण ते मोहाचे ।
भान हो जनाचे । मनी राहो ।।

विसरूनी सेवा । जनहिता वेळी ।
आपुलीच पोळी । भाजू नये ।।

अवलंबू नये । स्वार्थ लोभ नीती ।
विस्कटून नाती । इहलोकी ।।

काळाचीच रीत । व्यवहारी भ्रष्ट ।
अंती करी नष्ट । ध्यानी असो ।।

कोण नित्य येथे । थांबावया आले ।
जाणे ठरलेले । माघारीचे ।।

ऐसी वहिवाट । आहे या युगाची ।
हाक वास्तवाची । ऐक शिवा ।।

~शिवाजी सांगळे, बदलापूर जि.ठाणे

पुस्तक आणि बरच काही कडून वाचक परिवारास दिवाळीच्या प्रकाशमय शुभेच्छा

धन्यवाद

www.pustakanibarachkahi.com